जा.क्र./मनपा/शिक्षण/दिव्यांग/२०२१/
कार्यालय, महानगरपालिका औरंगाबाद
दिनांक :- २५/०३/२०२१

**बैठकीचे इतिवृत्त :-**

**विषय** :-दिव्यांगांसाठी राखीव निधीचा विनियोग करणेसाठी शासन निर्णयातील प्रयोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी नियमावली अंतिम करणेबाबत गठीत समितीची बैठक

**स्थळ** :- मा.अतिरीक्त आयुक्त-१ यांचे दालन

**दिनांक व वेळ** :- २५ मार्च २०२१ वेळ – दुपारी ३.०० वाजता

शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.११८/नवि-२० दि.२८/१०/२०१५ मध्ये नमूद मार्गदर्शक सूचना व प्रयोजनानूसार सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात तरतूद उपलब्ध केली असल्याचे जाहीर प्रगटन दि.१३/१०/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेले आहे. तसेच कार्यालयीन आदेश क्र.मनपा/मआ/स्वीस/२०२०/३५६ दि. १६/१०/२०२० अन्वये शासन निर्णयातील प्रयोजनांची अंमलबजावणी करणेसाठी संबंधीत विभागांना नियमावली तयार करणेबाबत आदेशीत करण्यात आले होते. त्यानूसार विभागांनी सादर केलेल्या नियमावलीवर जाहीर प्रगटन जा.क्र.मनपा/शिक्षण/२०२१/०२ दि. २०/०१/२०२१ द्वारे मा. प्रशासक महोदय यांच्या आदेशान्वये योजनानिहाय अटी व शर्तीवर सुचना व हरकती मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त आक्षेप व हरकतीवर समितीमध्ये चर्चा करण्यात येऊन नियमावलीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे अंतिम करण्यात आल्या. अंतिम केलेल्या अटी व शर्तीनुसार प्राप्त अर्जावर प्रशासकीय मान्यता घेऊन संबंधीत विभागामार्फत नियमानूसार कार्यवाही करण्यात येईल असे ठरले.

सन २०१९-२० मध्ये लाभ घेतलेल्या ८२७ दिव्यांगांना सन २०२०-२१ च्या आर्थिक वर्षातील योजनांचा लाभ देणेसाठी वगळण्यात यावे असे ठरले. एका आर्थिक वर्षात एका दिव्यांग व्यक्तीला एकाच योजनेचा लाभ मिळेल. मतिमंद हे इतर व्यक्तींवर अवलंबून असतात त्यामुळे त्यांना टक्केवारीची अट शिथील करण्यात येते. शासकीय सेवेचा लाभ घेणा-या दिव्यांगांना सदर योजनांचा लाभ देय असणार नाही तसेच कालानुरूप योजनांमध्ये गठीत समितीमार्फत केलेले बदल मा.प्रशासक महोदय यांचे मान्यतेने लागू राहतील.

**सर्व योजनांसाठी Commen अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

१) अर्जदार दिव्यांग व्यक्ती हा औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील रहिवाशी असावा. (आधार कार्ड आणि १८ वर्षावरील दिव्यांग व्यक्तींचे निवडणूक ओळखपत्र आवश्यक)

२) अपंगत्व ४० % च्या वर असावे. यासाठी सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र अनिवार्य राहील.

३) संबंधीत दिव्यांगांनी महानगरपालिकेच्या झोन कार्यालयात दिव्यांग प्रमाणपत्रासह नोंदणी करणे बंधनकारक राहील.

४) सर्व योजनांमध्ये देण्यात येणारे अर्थसहाय्य अथवा भत्ता हा लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात वर्ग करणेसाठी बँक पासबूकची छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे. (पासबुक छायांकित प्रतीत IFS CODE/ ACCOUNT No. स्पष्टपणे दिसेल याची दक्षता घ्यावी.)

**वरील अटी व शर्ती व्यतिरीक्त योजना निहाय अटी व शर्ती खालीलप्रमाणे :**

| योजना | विषय | अटी, शर्ती व कार्यपध्दती |
|---|---|---|
| १) | अपंगांच्या शालेय शिक्षण / उच्च शिक्षण / खेळांडूकरीता शिष्यवृत्ती देण्यात यावी. | १) शिक्षण सुरू असल्याबाबत बोनाफाईड प्रमाणपत्र अनिवार्य.<br>२) इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंत रू.५००/- प्रतिमाह प्रमाणे १० महिन्यापर्यंत खात्यावर जमा करण्यात येईल.<br>३) इयत्ता ८ ली ते १२ वी पर्यंत रू.१,०००/- प्रतिमाह प्रमाणे १० महिन्यापर्यंत खात्यावर जमा करण्यात येईल.<br>४) केंद्र शासनाच्या लोकसेवा आयोग / महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या पूर्वतयारी करीता शासकीय स्पर्धा परिक्षा केंद्रात प्रवेश घेणा-या अपंग विद्यार्थ्यांच्या शुल्काची रक्कम नियमाप्रमाणे देता येईल. |
| २) | उत्पन्नाच्या अटीवर घरकुलांसाठी अर्थसहाय्य देणे. | १) औरंगाबाद शहरात मागील १५ वर्ष वास्तव्याचा पुरावा सादर करणे आवश्यक असेल.<br>२) अन्य घरकुल योजनेतून लाभ घेतला नसल्याबाबतचे रु.१००/- च्या मुद्रांकावर घोषणापत्र द्यावे लागेल.<br>३) घरकुलाचे जागेचा मालकी हक्क पुरावा आवश्यक असेल.<br>४) दिव्यांग कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न/आर्थिक दृष्टया कमकुवत घटकांचे मर्यादेत असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक असेल.<br>५) दिव्यांग कुटूंबाचे कच्चे घरकुल दर्शविणारा सद्यास्थितीचे छायाचित्र प्रस्तावासोबत आवश्यक असेल.<br>६) घरकुल जागेचा अद्यावत मालमत्ता कर भरणा पावती छायाप्रत सादर करणे आवश्यक असेल.<br>७) घरकुल योजनेच्या लाभार्थ्याला शासन नियमाप्रमाणे रु. २,५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. |

| | | |
|---|---|---|
| ३) | अपंगांच्या मागणीनूसार त्यांना उदरनिर्वाह / व्यवसाय / साहित्य खरेदी करण्याकरीता निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करावा. | १) जे दिव्यांग १०० टक्के दिव्यांग असतील व ते इतरांवर अवलंबून असतील अशा दिव्यांगांना उदरनिर्वाहासाठी एकत्रीत किंवा प्रतिमहा रक्कम संबंधीत दिव्यांगांच्या खात्यावर जमा करण्यात येईल.<br>२) दिव्यांग व्यक्तींना उदरनिर्वाह / व्यवसाय / साहित्य खरेदीसाठी जास्तीत जास्त रू ५०,०००/- अर्थसहाय्य देण्यात येईल.<br>३) पात्र लाभार्थ्यांचा प्रस्ताव गठीत समितीसमोर सादर केला जाईल. गठीत समितीचा निर्णय अंतिम राहील.<br>४) अर्जासोबत दोन पासपोर्ट साईज फोटो आवश्यक असेल.<br>५) जिल्हाधिकारी कार्यालयाचे रहिवाशी प्रमाणपत्र आवश्यक असेल.<br>६) रू.१.५० लक्ष पर्यंत वार्षिक उत्पन्नाचा दाखला आवश्यक.<br>७) व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक परवाने आवश्यक असेल.<br>८) ज्या ठिकाणी व्यवसाय सुरू करण्यात येणार आहे त्या जागेचा नकाशा, जागा भाडयाने घेतल्यास भाडे करारनामा, व्यवसायाचे स्वरूप सादर करणे आवश्यक असेल.<br>९) जो व्यवसाय सुरू करणे आहे त्याचेशी संबंधीत प्रशिक्षण (आवश्यक असल्यास)<br>१०)दिव्यांग व्यक्तीने सुरू करावयाचे व्यवसायाचे दरपत्रकानूसार व समितीच्या निर्णयानूसार संबंधीत एजन्सीच्या नांवे देयक अदा करण्यात येईल. |
| ४) | अपंगांना वैद्यकीय खर्चाकरीता निधी उपलब्ध करावा. | १) कुटूंबातील एखादी व्यक्ती शासकीय सेवेत नसल्याबाबतचे शपथपत्र आवश्यक असेल.<br>२) दिव्यांग व्यक्तीच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १.५ लाखापेक्षा कमी असावे, वार्षिक उत्पन्नाबाबत सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. |

३) शस्त्रक्रीया शासकीय संस्थेमध्ये होत असल्यास फक्त औषधांचा खर्च देय राहील तसेच शस्त्रक्रीया शासकीय संस्थेमध्ये होत नसल्यास तसे शासकीय संस्थेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.

४) लाभार्थ्यांने इतर योजना / आरोग्य विमा अंतर्गत आर्थिक लाभ घेतलेला नसल्याचे प्रमाणपत्र आवश्यक असेल..

५) मनपातर्फे लाभार्थ्यांना त्यांनी केलेल्या प्रत्यक्ष खर्चाच्या ९०% रक्कम किंवा जास्तीत जास्त रु. २,७०,०००/- पर्यंत अनुज्ञेय राहील.

६) आरोग्य विभागामार्फत तज्ञ व्यक्तींची समिती स्थापन करून त्यासमोर प्रस्ताव ठेवण्यात येईल व द्यावयाच्या रक्कमेबाबत ही समिती शिफारस करेल.

७) पात्र लाभार्थ्यांचा शिफारस केलेला प्रस्ताव गठीत समितीसमोर सादर केला जाईल व तद्नंतर अंतिम निर्णय घेतला जाईल.

८) औरंगाबाद महानगरपालिका हद्दीतील सर्व झोन कार्यालयात अद्याप पावेतो दिव्यांग नोंदणी झालेल्या एकुण ३५२६ दिव्यांगांचा एकत्रित आरोग्य विमा काढल्यास एक वर्षाच्या कालावधी एक वर्षाच्या कालावधीसाठी संबंधीत दिव्यांगांना औरंगाबाद शहरातील सर्व मोठया हॉस्पीटलमध्ये मोफत उपचार घेता येतील. त्यासाठी आरोग्य विमा काढणा-या कंपन्यांकडून स्वारस्य प्रस्ताव मागवून, त्यामधून जास्तीत जास्त सुविधा पुरविणा-या प्रस्तावाच्या अनुषंगाने निविदा अंतिम करण्यात येईल.

९) सदरील आरोग्य विमा योजनेची अंमलबजावणी झाल्यास महानगरपालिकेमार्फत स्वतंत्रपणे वैद्यकीय खर्च देय राहणार नाही परंतू उक्त कार्यवाहीसाठी विलंब लागणार असल्याने चालू आर्थिक वर्षात महानगरपालिकेमार्फत वैद्यकीय खर्च देता येईल.

| | | |
|---|---|---|
| | | १०)माहे एप्रिल २०२१ नंतर तुलनात्मक दृष्टीने विचार करून आरोग्य विमा योजना राबविता येईल. |
| ५) | नागरी वाहतुक व्यवस्थेमध्ये (सिटी बस) अपंगांकरीता प्रवासात सवलत देणे व याकरीता होणा-या तोटयाची भरपाई करणे. | १ ) ४०% ते ७५% दिव्यांगांना ७५% प्रवास भाड्यात सवलत.<br>२) ७६% ते १००% दिव्यांगांना ७५% प्रवास भाड्यात सवलत आणि दिव्यांगा सोबत असणाऱ्या साथीदारास नागरी वाहतूकीत (सिटी बस) प्रवास भाड्यात ५०% सवलत असेल.<br>३) शहर बस कार्यालयाकडून सवलत दिलेल्या तिकिटाची रक्कम त्यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार अदा करण्यात येईल. |
| ६) | शॉपींग मॉल, मंडया, इत्यादींमध्ये अपंगांना स्टॉल उभारण्याकरीता अर्थ सहाय्य करणे. | १) दिव्यांगांचे वर्गीकरण करून अंध, मुकबधीर व शारिरीक व्यंग यांना ३० टक्के प्रमाणे स्टॉल वाटप होईल. १० टक्के दिव्यांगांसाठी.<br>२) उत्पन्नाचा दाखला मुळ प्रत, आधार कार्डची छायांकीत प्रत सादर करावी व भाजीमंडीत देण्यात येईल.<br>३) मनपाने निश्चित केलेल्या व्यवसाया व्यतिरीक्त इतर व्यवसाय मनपाच्या पुर्व परवानगी शिवाय करता येणार नाही.<br>४) सदरील स्टॉलसाठी दिलेली जागा ही स्वत: व्यवसाय करणे करीता दिलेली असल्यामुळे भाडेतत्वावर इतरांना स्टॉल चालविण्यास देता येणार नाही.<br>५) निर्धारीत केलेल्या स्टॉलपेक्षा जास्त मागणी असल्यास लॉटरी पध्दतीने स्टॉल देण्यात येईल.<br>६) वरीलप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात हंगामी व सणानिमीत्त दिव्यांगांना स्टॉलसाठी परवानगी देण्यात येईल.<br>७) मनपाच्या शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये दिव्यांगांकरीता कोटा निश्चित केला जाईल.<br>८) लाभार्थ्यांना स्टॉल उभारणीकरिता जास्तीत जास्त रु. १ लक्ष पर्यंत रक्कम अनुज्ञेय असेल. |
| ७) | महत्वाच्या स्थानिक बस स्टॉप / डेपोमध्ये | १. सद्यास्थितीत मनपाकडे ३५४ व्हिलचेअर उपलब्ध असून या |

| | | |
|---|---|---|
| | व्हिलचेअर उपलब्ध करणे. | व्हिल चेअरचा वापर लोकसभा / विधानसभा निवडणूकीच्या वेळी प्रत्येक बुथवर अपंग मतदारांच्या सुविधेसाठी करण्यात आला होता. औरंगाबाद शहरातील सिटी बस वाहतुक व्यवस्थापन स्मार्ट सिटी परिवहन विभागातर्फे करण्यात येते. आवश्यकतेनूसार उपलब्ध व्हील चेअर स्मार्ट सिटी बस व्यवस्थापन विभागाकडे हस्तांतरीत करणे किंवा स्मार्ट सिटी बस व्यवस्थापन विभागाच्या मागणीनुसार सदर व्हील चेअर उपलब्ध करून देण्यात येईल.<br>२. व्हीलचेयर देखभाल व दुरुस्तीसाठी रु. ३,००,०००/- पर्यंत रक्कम अनुज्ञेय असेल. |
| ८) | सार्वजनिक वाचनालयामध्ये अंध व्यक्तींकरीता ऑडियो लायब्ररी निर्माण करणे. | १) औरंगाबाद मनपातर्फे सुरू करावयाचे झाल्यास खडकेश्वर व बन्सीलालनगर येथील वाचनालयात हॉल Soundproof करण्यात येईल.<br>२) ऑडीओ लायब्ररी करीता आवश्यक साहित्य उदा. विद्युत व्यवस्था, फर्निचर, संगणक, सी.डी., स्पीकर, हेडफोन, पेनड्राईव्ह, इंटरनेट कनेक्शन, इ. व्यवस्था करणे आवश्यक राहील.<br>३) मनपातर्फे वाचनालय सुरू करुन स्वत: चालविणे अथवा अंध दिव्यांगांच्या संस्थेने प्रस्ताव सादर केल्यास चालविण्यास देता येईल.<br>४) खाजगी व्यक्ती/संस्थेस चालविण्यासाठी देतांना सदरील व्यक्ती/ संस्था दिव्यांगांची मनपा हद्दीतील व नोंदणीकृत असणे आवश्यक.<br>५) संबंधीत लाभार्थ्यांकडे अंधत्वाचे प्रमाणपत्र आवश्यक असेल.<br>६) संबंधीतांकडे हॉल व उक्त सर्व सुविधा सदर ठिकाणी असणे आवश्यक. याप्रमाणे सर्व पूर्तता करत असल्यास प्रस्तावावर समितीच्या मान्यतेनंतर करार करून धोरण ठरविण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | ७) खाजगी व्यक्ती/संस्थेस जास्तीत जास्त रु. ५,००,०००/- पर्यंत रक्कम अनुज्ञेय असेल. |
| ९) | मनपाच्या शाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांकरीता सोयीसुविधा उपलब्ध करणे. | १) शाळेत येणे-जाणेसाठी व्हिलचेअर अथवा तीन चाकी सायकल.<br>२) मुकबधीर विद्यार्थ्यांना श्रवणयंत्र इत्यादी.<br>३) इतर कुठल्याही शिष्यवृत्ती न घेतल्याबाबत हमीपत्र.<br>४) अपंग विद्यार्थ्यांना गणवेश व विशेष शैक्षणिक साहित्य दिले जाईल.<br>५) याव्यतिरिक्त गरजू विद्यार्थ्यांना आवश्यकतेनूसार सोईसुविधा देणे.<br>६) एका शाळेकरिता रु. ५०,०००/- पर्यंत रक्कम अनुज्ञेय असेल. |
| १०) अ | अपंगांच्या क्रिडा, स्पर्धा आयोजित करणे. | १) मनपाच्या आणि दिव्यांग संघटनेच्या तांत्रिक सहकार्याने व संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येतील. कोणत्याही संघटनेला स्वतंत्र व वैयक्तीक स्पर्धा आयोजित करता येणार नाही व त्यासाठी अनुदान देता येणार नाही.<br>२) मनपा हद्दीबाहेरील खेळाडूंना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी निवासाच्या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थेकडे नोंदणी असणे आवश्यक.<br>३) जिल्ह्याच्या बाहेरील खेळाडु असोसिएशन मार्फतच सहभागी होतील, वैयक्तीक खेळाडूंना प्रवेश दिला जाणार नाही.<br>४) मनपा हद्दीतील खेळाडू दिव्यांग शाळा संस्था व वैयक्तीक सहभागी होऊ शकतील.<br>५) दिव्यांग खेळाडूंकडे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.<br>६) स्पर्धेच्या विहीत कालावधीपूर्वी नोंदणी करणे आवश्यक राहील.<br>७) शारिरीक अपंग व मुकबधीर यांच्या वेगवेगळया स्पर्धा होतील.<br>८) खेळाडूंना स्पर्धेच्या दरम्यान सकाळचा नाष्टा, दुपारचे व रात्रीचे भोजन दिले जाईल.<br>९) खेळाडूची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत असोसिएशन व खेळाडू यांची राहील. आयोजक यांची जबाबदारी असणार नाही तसे असोसिएशन व खेळाडू यांच्याकडून लेखी घेतले जाईल. |

| | | |
|---|---|---|
| | | १०) एका खेळाडूला जास्तीत जास्त दोन स्पर्धेत सहभागी होता येईल.<br>११) सर्व खेळाडूंकडे वैयक्तिक क्रीडा साहित्य, ड्रेस असणे आवश्यक.<br>१२) मनपा हद्दीतील खेळाडूंना प्रवास भाडे दिले जाणार नाही, मनपा हद्दीबाहेरील खेळाडूंना रेल्वे व बस प्रवासाचे तिकीट सादर केल्यानंतर शासन निर्णयाच्या सवलतीच्या दरानूसार तिकीटाची रक्कम दिली जाईल.<br>१३) वैयक्तीक वाहनाचे भाडे खेळाडूला दिले जाणार नाही.<br>१४) खेळाडूंना स्पर्धेच्या ठिकाणी स्वखर्चाने यावे लागेल.<br>१५) विभागीय स्पर्धेसाठी रु. २० लक्ष पर्यंत रक्कम अनुज्ञेय असेल.<br>१६) अखिल भारतीय दिव्यांग क्रिकेट स्पर्धेसाठी रु. २० लक्ष पर्यंत रक्कम अनुज्ञेय असेल. |
| १०) ब | अपंगांच्या चित्रकला, हस्तकला इ. स्पर्धा आयोजित करणे. | १) स्पर्धा नोंदणी कलादालन मनपाकडे सादर करावी लागेल.<br>२) अस्थिव्यंग, कर्णबधीर, अंध यामधील मतिमंद असलेल्यांना कमीत कमी प्रोत्साहनपर उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात येईल.<br>३) सहभागी स्पर्धकांना पालकांचे परवानगी पत्र अनिवार्य राहील.<br>४) स्पर्धेच्या ठिकाणी स्पर्धकांना ने-आण करण्याची जबाबदारी पालकांची राहील.<br>५) स्पर्धेसाठी नोंदणी व प्रवेश फी निशुल्क राहील.<br>६) स्पर्धकांना एकच कलाकृती सादर करता येईल.<br>७) स्पर्धेचे सर्व निर्णयांचे अधिकार आयोजकांकडे राहतील.<br>८) परिक्षकांचा निर्णय अंतिम बंधनकारक राहील.<br>९) स्थानिक स्वराज्य संस्थेकडे नोंदणी केलेली असावी.<br>१७) स्पर्धेकरिता रु. ५,००,०००/- पर्यंत रक्कम अनुज्ञेय असेल. |
| ११) | अपंगांच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे. | १) दि.०१.०१.२०२० नंतर लग्न झाल्याचा विवाह नोंदणी दाखला असावा. |

| | | |
|---|---|---|
| | | २) लाभार्थ्यांनी इतर शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसावा.<br>३) कोणत्याही खालील एका योजनेचा लाभ मिळेल. (सामाजिक न्याय, आंतरजातीय विवाह, अर्थसहाय्य, वित्त विभाग)<br>४) रहिवाशी दाखला, लग्न समारंभाचे फोटो, पत्रिका आवश्यक.<br>५) लग्नाच्या जोडीमधील एक व्यक्ती दिव्यांग असल्यास रू.२५,०००/-, दोन्ही व्यक्ती दिव्यांग असल्यास प्रत्येकी रू.२५,०००/- प्रमाणे रू.५०,०००/- अर्थसहाय्य देण्यात येईल.<br>६) अर्जदार हे विवाहासाठी शासकीय सेवेतील कर्मचारी नसावेत. |
| १२) | अपंगांना पेन्शन योजना सुरू करणे. | १) वय वर्षे ५० व त्यावरील दिव्यांगांना लाभ देय राहील.<br>२) लाभार्थ्यांनी इतर शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसावा.<br>३) अपंगत्वाच्या टक्केवारीनूसार एका आर्थिक वर्षात ४० ते ८० टक्के पर्यंत रू.१२,०००/- व ८० ते १०० टक्के पर्यंत अपंगत्वानूसार रू.१८,०००/- ची रक्कम दरमहा १२ समान भागात वितरीत करण्यात येईल. |
| १३) | अपंग बेरोजगारांना भत्ता देणे. | १) किमान शिक्षण १० उत्तीर्ण असणे आवश्यक असेल.<br>२) ITI किंवा इतर व्यवसायीक प्रशिक्षण / डिप्लोमा डिग्री असल्यास Additional Qualification समजण्यात येईल.<br>३) रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी व नुतनणीकरण केलेले असणे आवश्यक असेल. प्राप्त अर्जातील रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाकडील नोंदणीच्या जेष्ठता यादीनूसार निवड केली जाईल.<br>४) लाभार्थ्यांचे वय १८ ते ४५ वर्षे दरम्यान असावे.<br>५) अपंगत्वाच्या टक्केवारीनूसार एका आर्थिक वर्षात ४० ते ८० टक्के पर्यंत रू.१२,०००/- व ८० ते १०० टक्के पर्यंत अपंगत्वानूसार रू.१८,०००/- ची रक्कम दरमहा १२ समान भागात वितरीत करण्यात येईल. |
| १४) | अपंगांच्या कल्याणार्थ | १) दिव्यांग योजनांबाबत स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी |

| | | |
|---|---|---|
| | राबविण्यात येणा-या योजनांचा प्रचार / प्रसार करणे. | जाहिरात / जाहीर प्रगटन / जाहीर निवेदन समिती प्रमुख यांचे मान्यतेने टपाल स्वरूपात देण्यात येईल.<br>२) वेळोवेळी विविध विभागामार्फत दिव्यांग योजने बाबतच्या बातम्या दिव्यांग कक्षामार्फत टपाली स्वरूपात देण्यात येईल.<br>३) दिव्यांग योजनांबाबत स्थानिक वर्तमानपत्रात जाहिर प्रगटन व इतर जाहिरात प्रसिध्दी देण्यात येईल.<br>४) या योजनांचा जास्तीत जास्त प्रचार व प्रसारासाठी शहरातील एफ.एम.रेडीओ जींगल व स्थानिक न्युज चॅनेलवर जाहिराती प्रसिध्द करण्यात येईल.<br>५) सर्व योजनांच्या माहितीचे फलक/होर्डींग तयार करून सर्व झोन कार्यालयात व मनपा मुख्यालयात दर्शनी भागात लावण्यात येईल.<br>६) दिव्यांग कल्याणकारी योजनेच्या प्रचारासाठी निवड समितीने मान्यता दिल्यानूसार माहिती पुस्तीका छापून कार्यालयात येणा-या अभ्यागतांना देण्यात येईल.<br>७) सदरील माहिती पुस्तीका संबंधीत वार्ड कार्यालयामार्फत वार्ड कार्यालय अंतर्गत येणा-या दिव्यांगाना घरपोहोच पोहोच करण्यात येईल.<br>८) दिव्यांग योजनांच्या प्रचार व प्रसारासाठी जनजागृती शिबीरांचे अयोजन करणे या शिबीरांसाठी तज्ञ मार्गदर्शक यांना आमंत्रीत करण्यात येऊन त्यांचे मानधन व प्रवासखर्च देण्यात येईल व उपस्थित शिबीरार्थींसाठी अल्पोपहाराचे आयोजन करण्यात येईल.<br>९) खाजगी संस्थेस फलक/होर्डींग, एफ. एम. रेडीओ जींगल, स्थानिक न्युज चॅनेलवर/पेपर जाहिराती इ. करिता रु. ३० लक्ष पर्यंत रक्कम अनुज्ञेय राहील. |
| १५) | उपरोक्त व्यतिरीक्त | १) संवेदना उद्यान (Sensory Garden) तयार करणे. |

| | | |
|---|---|---|
| | तिथल्या स्थानिक परिस्थीतीनूसार आवश्यक असलेल्या महत्वाकांक्षी योजना अंमलात आणणे. | २) संवेदना उद्यान दिव्यांग मुलांना त्यांच्या अनेक इंद्रियांना गुंतवून ठेवताना अन्वेषण, शोध, कल्पना, निर्माण आणि शिकण्याची प्रेरणा देतात.<br>३) उपरोक्त व्यतिरीक्त स्थानिक परिस्थीतीनूसार महत्वकाक्षी योजनेवर रु. २५ लक्ष पर्यत निधी अनुज्ञेय राहील.<br>४) सदरील शासन निर्णयातील योजनांच्या व्यतिरीक्त दिव्यांगाकडून एखाद्या योजनेची मागणी प्राप्त झाली तर स्थानिक परिस्थीतीनूसार अनुज्ञेय असल्यास समितीची मान्यतेनूसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. |

उपरोक्त प्रमाणे दिव्यांगांच्या दिनांक २८/१०/२०१५ च्या शासन निर्णयातील योजनांची Commen व योजनानिहाय अटी शर्ती बैठकीत झालेल्या चर्चेनूसार दुरूस्त करून इतिवृत्तात समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. करीता सर्व समिती सदस्यांच्या संमतीने प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**मालमत्ता अधिकारी**
महानगरपालिका औरंगाबाद

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी**
महानगरपालिका औरंगाबाद

**मुख्य लेखाधिकारी**
महानगरपालिका औरंगाबाद

**उपआयुक्त**
महानगरपालिका औरंगाबाद

Signed by all Pages

**उपआयुक्त (प्रशासन)**
महानगरपालिका औरंगाबाद

**मुख्य लेखापरिक्षक**
महानगरपालिका औरंगाबाद

**अध्यक्ष तथा अतिरीक्त आयुक्त-१**
महानगरपालिका औरंगाबाद

**प्रति,**
**मा. प्रशासक महोदय,**
**महानगरपालिका औरंगाबाद.**